प्रकरण VI

कल्याणकारी योजनांचे आर्थिक व्यवस्थापन व अंमलबजावणी

प्रकरण-VI
कल्याणकारी योजनांचे आर्थिक व्यवस्थापन व अंमलबजावणी

6.1 आर्थिक व्यवस्थापन

6.1.1 निधीचा वापर

इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियमाच्या कलम 24 नुसार मंडळाला अधिनियमातील तरतुदींनुसार आपला खर्च भागविण्यासाठी इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण निधी नावाचा निधी स्थापन करणे आवश्यक होते. या निधीत केंद्र शासनाने मंडळाला दिलेले अनुदान किंवा कर्ज, लाभार्थ्यांनी दिलेले सर्व अंशदान आणि केंद्र शासनाने नेमून दिलेल्या स्त्रोतातून मंडळाला प्राप्त होणाऱ्या सर्व रक्कम जमा करणे आवश्यक होते. इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियमाच्या कलम 22 नुसार मंडळाचे कामकाज पार पाडताना होणारा खर्च, मंडळाचे सदस्य, अधिकारी व इतर कर्मचारी यांचे वेतन, भत्ते व इतर मानधन तसेच इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियमाने प्राधिकृत केलेल्या ध्येय व उद्दिष्टांवरील खर्च भागविण्यासाठी हा निधी होता. सप्टेंबर 2007 मध्ये मंडळाने हा निधी स्थापित केला. मंडळाने याबरोबरच कामगारांना सुरक्षा आणि जीवनावश्यक संचाचे वाटप, कोविड महामारीदरम्यान आर्थिक मदत आणि कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य योजना, प्रसूती लाभ, अंत्यसंस्कार सहाय्य आणि गंभीर आजारांसाठी इतर सहाय्य योजना राबविल्या होत्या.

2017-18 ते 2021-22 या कालावधीत मंडळाच्या निधीतील जमा व त्यातून झालेला खर्च **तक्ता 6.1** मध्ये दर्शविण्यात आला आहे.

तक्ता 6.1 : 2017-18 ते 2021-22 या कालावधीत मंडळाच्या निधीतील जमा व खर्च

(₹ कोटीत)

वर्ष	आरंभिची शिल्लक	उपकर संकलन	प्राप्त व्याज	नोंदणी शुल्क व इतर जमा	पूर्व कालावधी समायोजन	उपलब्ध निधी	खर्च	अंतिम शिल्लक	उपलब्ध निधीतील खर्चाची टक्केवारी
2017-18	5,857.29	1,145.99	342.88	3.31	-	7,349.47	78.53	7,270.94	1.07
2018-19	7,270.94	1,362.33	634.39	5.67	54.76	9,328.09	402.47	8,925.62	4.31
2019-20	8,925.62	1,511.35	615.79	6.13	-39.29	11,019.6	1,118.01	9,901.59	10.15
2020-21	9,901.58	1,404.23	564.92	2.38	-7.83	11,865.29	1,079.90	10,785.39	9.10
2021-22	10,785.39	2,265.83	413.92	7.68	0.09	13,472.91	1,803.31	11,669.60	13.38
एकूण		**7,689.73**	**2,571.90**	**25.17**	**7.73**		**4,482.22**		

स्त्रोत: *मंडळाकडून मंजूर झालेले 2017-18 ते 2021-22 या वर्षांचे वार्षिक लेखे*

तक्ता 6.1 मध्ये दर्शविल्याप्रमाणे 2017-18 ते 2021-22 दरम्यान उपलब्ध निधीच्या तुलनेत खर्च 1.07 टक्के ते 13.38 टक्के इतका होता. कामगारांच्या कल्याणासाठी निधीचा कमी वापर झाल्याने मंडळाने मार्च 2022 अखेरीस राष्ट्रीयकृत बँकांमध्ये मुदत ठेवींमध्ये ₹ 11,350 कोटींची गुंतवणूक केली होती. 2017-18 ते 2021-22 या कालावधीत ₹ 4,482.22 कोटी एकूण खर्चापैकी कल्याणकारी योजनांच्या

अंमलबजावणीवर ₹ 4,253.77 कोटी खर्च करण्यात आला होता. अशाप्रकारे**,** मंडळाने 2017-18 ते 2021-22 दरम्यान उपलब्ध असलेल्या ₹ 16,151.82 कोटी (2017-18 ची आरंभीची शिल्लक मिळून) फक्त 26.34 टक्के निधी कल्याणकारी योजना कार्यान्वित करण्यासाठी खर्च केला.

उत्तरादाखल शासनाने नमूद केले (जुलै 2024) की, 2017-18 **ते** 2021-22 या कालावधीत सुरूवातीला योजनांवर कमी खर्च झाला परंतु नंतर लाभार्थ्यांच्या नोंदणीत व नूतनीकरणामध्ये वाढ झाल्याने योजनांवरील खर्च वाढला.

6.1.2 वार्षिक अहवाल व वार्षिक लेखे

इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियमाच्या कलम 26 मध्ये असे नमूद केले आहे की, मंडळाने मागील आर्थिक वर्षातील कामकाजाचा संपूर्ण लेखाजोखा दर्शविणारा वार्षिक अहवाल तयार करावा आणि त्याची प्रत राज्य शासन व केंद्र शासनाला सादर करावी. तसेच, इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियमाच्या कलम 27 मध्ये असे नमूद केले आहे की, मंडळाने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याशी सल्लामसलत करून विहित केलेल्या स्वरूपातील लेखे, इतर संबंधित दस्तऐवज ठेवावेत आणि वार्षिक लेख्यांचे विवरण तयार करावे. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सेवा, अधिकार व शर्ती अधिनियमाच्या कलम 19 (2) सह इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियमाच्या कलम 27 (3) अन्वये भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याद्वारे मंडळाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण केले जाते. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार नियमावलीच्या नियम 44 सह अधिनियमाच्या कलम 27 (4) नुसार मंडळाने 31 मार्च रोजी संपलेल्या मागील वर्षाच्या मंडळाच्या कामकाजाचा लेखापरीक्षण झालेला वार्षिक अहवाल तसेच लेखापरीक्षकांचा अहवाल राज्य शासनाला 31 ऑक्टोबरपूर्वी सादर करणे आवश्यक होते.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, वर्ष 2020-21 पर्यंतचे मंडळाचे अहवाल व वार्षिक लेखे तयार करून त्याचे लेखापरीक्षण करण्यात आले होते. वर्ष 2020-21 आणि 2021-22 च्या वार्षिक लेख्यांना मंडळाने विलंबाने अनुक्रमे डिसेंबर 2022 आणि जुलै 2024 मध्ये मान्यता दिली. वर्ष 2020-21 व 2021-22 चे वार्षिक अहवाल व वार्षिक लेखे अद्याप (जुलै 2024) राज्य शासनाला सादर करणे प्रलंबित होते

उत्तरादाखल मंडळाने नमूद केले (ऑगस्ट 2023) की, कोविड-19 महामारी आणि त्यामुळे जाहीर झालेली टाळेबंदी यामुळे वर्ष 2020-21 चे वार्षिक लेखे सादर करण्यास विलंब झाला आणि राज्य शासनास लेखे सादर करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर होती.

6.2 मंडळाची कार्ये

इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम, 1996 च्या कलम 22 अंतर्गत मंडळाची कार्ये खालीलप्रमाणे नमूद केली आहेत:

i. अपघात झाल्यास लाभार्थ्याला तात्काळ मदत देणे;

ii. वयाची साठ वर्षे पूर्ण झालेल्या लाभार्थ्यांना निवृत्तीवेतन देणे;

iii. विहित केल्याप्रमाणे घर बांधण्यासाठी लाभार्थ्यास कर्ज व अग्रिम मंजूर करणे;

iv. विहित केल्याप्रमाणे लाभार्थ्यांच्या गट विमा योजनेच्या हप्त्याच्या संदर्भात प्रदाने;

v. विहित केल्याप्रमाणे लाभार्थ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत;

vi. विहित केल्याप्रमाणे लाभार्थी किंवा त्यांच्या आश्रितांच्या प्रमुख आजारांच्या उपचारांसाठी वैद्यकीय खर्च भागविणे;

vii. महिला लाभार्थ्यांना मातृत्व लाभ देणे;

viii. विहित केल्याप्रमाणे इतर कल्याणकारी उपाय योजना व सुविधांची तरतूद व त्यांच्यात सुधारणा करणे;

ix. कोणत्याही आस्थापनातील बांधकाम कामगारांच्या कल्याणाशी संबंधित हेतूने राज्य शासनाने मंजूर केलेल्या कोणत्याही योजनेच्या सहाय्याने स्थानिक प्राधिकरण किंवा नियोक्त्याला कर्ज किंवा अनुदान देणे; आणि

x. बांधकाम कामगार आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या फायद्यासाठी मंडळाने निर्दिष्ट केलेल्या दर्जाच्या मंडळाच्या समाधानाइतक्या कल्याणकारी उपाययोजना आणि सुविधा प्रदान करणाऱ्या स्थानिक प्राधिकरणास किंवा नियोक्त्याला अनुदान देणे.

- **मंडळाने निवृत्तीवेतन आणि गट विमा यांसाठी योजना तयार केल्या नाहीत:**

इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियमाच्या कलम 22 (1) (ब) आणि (ड) नुसार मंडळाने वयाची साठ वर्षे पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांच्या निवृत्तीवेतनचा भरणा करावा आणि योग्य वाटेल त्यानुसार लाभार्थ्यांच्या गट विमा योजनेच्या हप्त्याशी संबंधित रक्कम भरावी**.** वयाची 60 साठ वर्षे पूर्ण झालेल्या लाभार्थ्यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत तसेच लाभार्थ्यांच्या गट विमा योजनेचा हप्ता भरण्याची योजना मंडळाने आखली नसल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले**.**

उत्तरादाखल, शासनाने लाभार्थ्यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत योजना आखणे आणि गट विमा योजनेचा हप्ता भरण्याची योजना प्रगतीपथावर असल्याचे नमूद (जुलै 2024) केले**.** निर्गमन बैठकीत (जुलै 2024) प्रधान सचिवांनी नमूद केले की, लेखापरीक्षणात निदर्शनास आणून दिल्यानंतर मंडळाने विमा योजनांसाठी आयुर्विमा महामंडळाशी संपर्क साधला आहे**.** लाभार्थ्यांसाठी निवृत्तीवेतन योजना लागू करण्यापूर्वी नोंदणीचा किमान कालावधी निश्चित केला जाईल, असेही प्रधान सचिवांनी नमूद केले.

6.2.1 सुरू असलेल्या कल्याणकारी योजनांची स्थिती

उपरोक्त कार्यांसाठी 2017-18 ते 2021-22 या कालावधीत मंडळाने 18 योजना राबविल्या होत्या ज्यावर ₹ 4,253.77 कोटी खर्च झाला होता. प्रत्येक योजनेवरील योजना-निहाय खर्च **परिशिष्ट 6.1** मध्ये एकत्रित दर्शविला आहे. 18 योजनांपैकी ₹ 4,187.85 कोटींचा (98 टक्के) खर्च समाविष्ट असलेल्या 10 योजना लेखापरीक्षणासाठी निवडण्यात आल्या होत्या चाचणी-तपासणी करण्यात आलेल्या 10 योजनांवर राज्यात आणि राज्यातील निवडलेल्या सहा जिल्ह्यांत झालेला खर्च **तक्ता 6.2** मध्ये दर्शविला आहे.

तक्ता 6.2: राज्य व निवडलेल्या जिल्ह्यांतील 2017-18 ते 2021-22 दरम्यान चाचणी-तपासणी केलेल्या योजनांवरील खर्च

अनु. क्र.	योजनेचे नाव	2017-18 ते 2021-22 या कालावधीत राज्यात झालेला खर्च (₹ कोटींत)	एकूण खर्चाशी टक्केवारी	निवडलेल्या सहा जिल्ह्यांमध्ये योजनेचा खर्च (₹ कोटींत)	ज्या लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला त्यांची संख्या
1	मध्यान्ह भोजन	925.91	22.12	585.77	170440
2	सुरक्षा संचाचे वाटप	828.96	19.79	155.26	2,98,690
3	जीवनावश्यक संचाचे वाटप	841.52	20.09	166.69	3,21,425
4	कोविड-19 दरम्यान दिलेले सहाय्य	684.07	16.34	*	*
5	शिक्षण, सामाजिक, आर्थिक व आरोग्यविषयक विविध योजनांतर्गत थेट लाभ हस्तांतरण	461.63	11.02	50.85	42799
6	अवजारे खरेदीसाठी ₹ 5,000/- चे आर्थिक सहाय्य	322.23	7.70	64.17	1,28,350
7	वैद्यकीय तपासणी	59.19	1.41	16.37	86,381
8	अटल बांधकाम कामगार आवास योजना				
8(i)	नागरी	6.82	0.16	अंमलबजावणी झाली नाही	अंमलबजावणी झाली नाही
8(ii)	ग्रामीण	6.67	0.16	*	*
9	इतर मंडळानी राबविलेल्या योजना (महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ)	22.20	0.53	*	*
10	पूर्व शिक्षण योजनेची मान्यता	28.65	0.68	*	*
	एकूण	**4,187.85**	**100**	**1,039.11**	

स्त्रोत : मंडळाने दिलेली माहिती. माध्यान्ह भोजन योजनेत नोंदणीकृत आणि नोंदणी नसलेल्या कामगारांचा समावेश होता.
** मंडळाने लेखापरीक्षणास माहिती सादर केली नाही.*

तक्ता 6.2 वरून निदर्शनास आल्याप्रमाणे मंडळाने मध्यान्ह भोजन योजना, सुरक्षा/जीवनावश्यक संच व कोविड-19 महामारी कालावधीत सहाय्य वाटपावर प्रामुख्याने मोठा खर्च केला.

निवडलेल्या योजनांच्या लेखापरीक्षणात निदर्शनास आलेली निरीक्षणे यापुढील परिच्छेदांत चर्चिली आहेत.

6.3 मध्यान्ह भोजन योजना

बांधकामाच्या ठिकाणी कामगारांना पोषक आहार मिळावा आणि त्यांच्या आरोग्यावर व कार्यक्षमतेवर सकारात्मक परिणाम व्हावा या उद्देशाने मंडळाने मध्यान्ह भोजन योजना प्रस्तावित केली (फेब्रुवारी 2018). 50 पेक्षा जास्त आणि 250 पेक्षा कमी नोंदणीकृत कामगार असलेल्या बांधकाम स्थळांवर मध्यान्ह भोजन योजना राबविण्यात येणार होती. याशिवाय, रेडिओ फ्रिक्वेन्सी आधारित वितरण कार्ड आणि क्लाऊड बेस्ड देखरेख प्रणाली मंडळाच्या इतर यंत्रणांशी जोडून ती हाती घेण्याचा ही प्रस्ताव आहे. विभागाने मार्च 2018 मध्ये मध्यान्ह भोजन योजनेला मंजुरी दिली. कोविड-19 चा प्रादुर्भाव आणि त्यानंतरच्या टाळेबंदीमुळे विभागाने (एप्रिल 2020) रात्रीच्या वेळी जेवण देण्यासह नोंदणी नसलेल्या

कामगारांना मध्यान्ह भोजन योजनेअंतर्गत लाभ दिला. या योजनेला वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आणि नोव्हेंबर 2023 पासून विभागाने ती बंद केली.

मार्च 2022 पर्यंत मंडळाच्या निधीतून या योजनेवर ₹ 925.92 कोटी खर्चून 14.90 कोटी भोजनांचे वाटप करण्यात आले. कामगारांना पुरविण्यात येणाऱ्या माध्यान्ह भोजन योजनेसंबंधीच्या दस्ताऐवजांच्या चाचणी-तपासणीत खालील अनियमितता निदर्शनास आल्या.

6.3.1 करार व्यवस्थापनामधील त्रुटी

बांधकाम स्थळे आणि कामगार नाका (जेथे मजूर रोज जमतात ते ठिकाण) येथे नोंदणीकृत कामगारांना ताजे शिजवलेले मध्यान्ह भोजन तयार करून पुरविणे आणि वितरित करण्यासाठी मंडळाकडून तीन वर्षांच्या कालावधीसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या (मार्च 2018). प्राप्त निविदांच्या आधारे मंडळाने तीन अभिकरणांशी[34] तीन वर्षांसाठी करार (मार्च 2019) केले. करारात मेनू, वाहतूक व वाटप, मनुष्यबळ संसाधने आणि वाटप कार्ड प्रणाली या मूल्य घटकांसह प्रति माध्यान्ह भोजन दर नमूद केला होता. मेसर्स गुणिना कमर्शियल प्रायव्हेट लिमिटेड, मेसर्स इंडो अलाइड प्रोटीन फूड्स प्रायव्हेट लिमिटेड आणि मेसर्स जस्ट किचन प्रायव्हेट लिमिटेड यांना देण्यात आलेल्या करारानुसार प्रति भोजन खर्च अनुक्रमे ₹ 62.75, ₹ 62.73 आणि ₹ 62.70 होता ज्यात प्रति भोजन अनुक्रमे ₹ 5.64, ₹ 5.95 आणि ₹ 5.29 (वस्तू व सेवा करासहित) दराने कार्ड वितरण प्रणालीच्या खर्चाचा समावेश होता.

- करारातील अटी व शर्तींनुसार रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेंटिफिकेशन टॅग, वितरण कार्डचा युनिक आयडी क्रमांक, प्रत्येक कामगाराला जास्तीत जास्त देण्यात येणाऱ्या भोजनाची संख्या, प्रत्येक कामगाराच्या भोजनाची दैनंदिन निश्चित मर्यादा असे नमूद केलेले छेडछाड प्रतिरोधक वितरण कार्ड तयार करण्याची जबाबदारी या अभिकरणांवर होती. हे कार्ड कामगारांना वितरित[35] करण्यात येणार होते आणि अभिकरणांनी वितरण कार्ड रीडरच्या मदतीने कार्ड स्वाइप केल्यानंतरच नोंदणीकृत कामगारांना भोजन वाटप करणे आवश्यक होते. कामगारांनी सेवन केलेल्या भोजनाचे प्रमाणीकरण करणाऱ्या नोंदवह्या विहित नमुन्यात ठेवून, ऑनलाइन वितरण प्रणाली उपलब्ध नसल्यास ईमेलद्वारे सर्व ऑफलाइन अहवाल सादर करण्याची मुभा देणारी कलमे (कलम 2.8.7 व 2.10.30.7) ही देखील करारात होती. नोंदणीकृत कामगारांची नोंद करण्यासाठी सॉफ्टवेअरचा पुरवठा, स्थापना आणि अंमलबजावणी[36] करणे, भोजनाच्या नोंदींचे दैनंदिन वितरण करणे आणि करार कालावधीसाठी मंडळाला आवश्यक असलेल्या

---

[34] मेसर्स गुणिना कमर्शियल प्रायव्हेट लिमिटेड, मेसर्स इंडो अलाइड प्रोटीन फूड्स प्रायव्हेट लिमिटेड आणि मेसर्स जस्ट किचन प्रायव्हेट लिमिटेड

[35] 5 मार्च 2019 रोजी कार्यादेश देण्यात आले. कार्यादेश जारी केल्याच्या तारखेपासून पाच आठवड्यांच्या आत कार्ड वाटप सुरू होणार होते

[36] कार्यादेश दिल्यानंतर तीन आठवड्यांच्या आत अंमलबजावणी करावी.

विविध अहवालांची माहिती मिळविण्यासाठी क्लाऊड बेस्ड देखरेख ही देखील अभिकरणांची जबाबदारी होती.

या तिन्ही अभिकरणांनी करारानुसार वितरण कार्ड पुरविली नसल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले. तथापि, कार्ड वितरण प्रणाली लागू झाली नसली तरी मंडळाने खर्च कमी न केल्याने मार्च 2022 पर्यंत 14.90 कोटी भोजन वाटपावर ₹ 81.56 कोटींचे[37] जास्त प्रदान झाले. पुढे असेही निदर्शनास आले की, करारानुसार क्लाउड आधारित देखरेख यंत्रणा विकसित केली गेली नव्हती.

करारातील कलम 2.8.7 व 2.10.3.7 नुसार ऑनलाइन वितरण प्रणाली उपलब्ध नसल्यास बांधकाम कामगारांनी सेवन केलेल्या भोजनाचे प्रमाणीकरण करणारी नोंदवही विहित नमुन्यात राखणे आणि सर्व ऑफलाईन अहवाल ई-मेलद्वारे सादर करणे ही अभिकरणाची जबाबदारी आहे, असे शासनाने उत्तरादाखल नमूद केले (जुलै 2024). रेडिओ फ्रिक्वेन्सीवर आधारित कार्ड वितरण प्रणालीवर करावयाच्या खर्चापुरती देयके मर्यादित असल्याने अतिरिक्त देयके नसल्याचेही नमूद करण्यात आले. मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितले की, कोविड परिस्थितीमुळे अन्न वितरण कार्ड सुरू होऊ शकले नाही. परंतु 2022-23 आणि 2023-24 मध्ये मंडळाने अन्न वितरण कार्ड वितरित करण्यास सुरुवात केली आणि प्रत्यक्ष लिखित नोंदी देखील ठेवल्या. निर्गमन बैठकीमध्ये (जुलै 2024) प्रधान सचिवांनी क्लाऊड आधारित देखरेख प्रणाली विकसित झाली नसल्याचे मान्य केले. हे उत्तर स्वीकारार्ह नाही कारण नमूद केलेली कलमे केवळ ऑनलाइन प्रणाली उपलब्ध नसल्यास नोंदी ठेवण्यासाठी सक्षम कलमे होती आणि ऑनलाइन प्रणालीसाठी पर्याय नव्हती.

शिवाय, असेही निदर्शनास आले की, अभिकरणांनी सादर केलेल्या देयकांत नोंदणीकृत कामगारांनी नावे आणि प्रत्येक कामगारास दिलेल्या भोजनांची संख्या यांसारखा तपशील नव्हता. वितरण कार्ड प्रणालीच्या अभावी, कामगारांवर वितरित केलेल्या भोजनांच्या संख्येची सत्यता लेखापरीक्षणात पडताळता आली नाही.

उत्तरादाखल शासनाने नमूद केले (जुलै 2024) की, कामगार नाका व बांधकाम स्थळांवरील भोजन वाटपाचा तपशील मार्च 2023 मध्ये प्रादेशिक कार्यालयांकडून मागविण्यात आला होता.

6.4 सुरक्षा संच आणि जीवनावश्यक वस्तू संचाचे वाटप

मंडळाने नोंदणीकृत कामगारांना सुरक्षा संच (संरक्षक बूट, धूळ मुखपट्टी , श्रवण संरक्षक, संरक्षण शिरस्त्राण, संरक्षण हातमोजे, संरक्षण पट्टे आणि परावर्तीत जॅकेट) आणि जीवनावश्यक संच (प्लास्टिक चटई, मच्छरदाणी, सौर विजेरी, टिफिन बॉक्स, पाण्याची बाटली, आउटर बॅग, गॅल्व्हेनाइज्ड ट्रंक) देण्याचा निर्णय (सप्टेंबर 2017) घेतला. विभागाने दोन्ही प्रस्तावांना नोव्हेंबर 2017 मध्ये मंजुरी दिली

[37] ₹ 5.64 * 3,70,53,593 जेवणे + ₹ 5.29 * 8,97,14,349 जेवणे + ₹ 5.95 * 2,21,92,097 जेवणे = ₹ 81,56,14,148.

मंडळाने 2.25 लाख सुरक्षा संच आणि 2.25 लाख जीवनावश्यक संचांच्या वितरणासाठी निविदा मागविल्या. प्राप्त निविदांच्या आधारे इंडो अलाइड प्रोटीन फूड प्रायव्हेट लिमिटेडला 2.25 लाख सुरक्षा संच (₹ 4,661 प्रति संच अधिक वस्तू व सेवा कर या दराने ₹ 104.87 कोटी) वितरणाचा पुरवठा आदेश देण्यात (14 जून 2018) आला.

त्याचप्रमाणे 2.25 लाख जीवनावश्यक वस्तूंच्या संचाच्या वितरणाचा पुरवठा आदेश (₹ 4,579 प्रति संच अधिक वस्तू व सेवा कर या दराने ₹ 103.03 कोटी) गुणिना कमर्शियल्स प्रायव्हेट लिमिटेडला देण्यात आला (14 जून 2018). त्यानंतर विभागाच्या मान्यतेने त्याच कंत्राटी अभिकरणांना अतिरिक्त संचांच्या वितरणाचा आदेशही देण्यात आला.

मार्च 2022 पर्यंत सुरक्षा आणि जीवनावश्यक संच वितरणावर ₹ 1,670.48 कोटी खर्च करण्यात आले.

लेखापरीक्षणात निविदा अटींतील त्रुटी, एकाच लाभार्थ्याला अनेकदा संचाच्या वाटपाची प्रकरणे व खरेदी धोरणाचे उल्लंघन करून देण्यात आलेले पुनरावृत्ती आदेश अशी प्रकरणे निदर्शनास आली जी खालील परिच्छेदांत चर्चिली आहेत.

6.4.1 निविदा अटीतील त्रुटी

मंडळाने जारी केलेल्या प्रस्ताव विनंतीमध्ये (नोव्हेंबर 2017) निविदेमध्ये भाग घेण्यास पात्र होण्यासाठी निविदाकाराचा अनुभव निर्दिष्ट करण्यात आला होता. प्रस्ताव विनंतीमध्ये निर्दिष्ट केले आहे की, निविदाकाराने मूल्याच्या दृष्टीने किंवा प्रमाणाच्या दृष्टीने पुरवठा, वाटप आणि वितरणासाठी किमान कार्यादेशाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

प्रस्ताव विनंतीमध्ये नमूद केलेली अनुभवाची अट सदोष होती कारण त्यात (i) जीवनावश्यक वस्तू आणि सुरक्षा संच पुरवठ्यातील अनुभव निर्दिष्ट केला नव्हता (ii) **परिशिष्ट 6.2** च्या अनु.क्र. 1 (ब), 2 (ब) आणि 3 (ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे पुरविलेल्या वस्तूंचे मूल्य निर्दिष्ट न करता 1.80 लाख वस्तू/बाबींच्या वितरणाचा अनुभव (किमान एक कार्यादेश) किंवा 1.20 लाख वस्तू/बाबींचे वितरण (किमान दोन कार्यादेश) किंवा 0.90 लाख वस्तू/बाबींचे वितरण (किमान तीन कार्यादेश) विनिर्दिष्ट केले होते. परिणामी, **तक्ता 6.3** मध्ये दर्शविल्यानुसार, कार्यादेशाचे मूल्य विचारात न घेता शालेय विद्यार्थ्यांना पुरविल्या जाणाऱ्या वस्तूंच्या संख्येच्या आधारे विजेते निविदाकार पात्र ठरले.

तक्ता 6.3: प्रस्ताव विनंतीत नमूद केलेल्या संख्येच्या आधारावर निविदाकारांना पात्र मानले गेले

अभिकरणाचे नाव	वस्तू	प्रमाण/संख्या (लाखात)	मूल्य (₹ कोटींत)
गुणिना कमर्शियल्स प्रायव्हेट लिमिटेड (जीवनावश्यक संच)	शाळेसाठी दप्तरे संच	10.88	44.15
	एकूण		**44.15**
इंडो अलाइड प्रोटीन फूड प्रा.लि. (सुरक्षा संच)	वह्या	2.93	10.15
	मोज्यांसहित काळे बूट	1.54	5.47
	एकूण		**15.62**

स्त्रोत: निविदेच्या वेळी निविदाकारांनी सादर केलेले तांत्रिक प्रस्ताव

उत्तरादाखल शासनाने नमूद केले की (जुलै 2024), केंद्रीय दक्षता आयोगाने 7 मे 2004 च्या संक्षेपलेखाद्वारे निविदा दस्तऐवजामध्ये नमूद केलेले पूर्व-पात्रता निकष निविदाकारांच्या प्रवेशावर निर्बंध आणण्यासाठी/प्रवेश सुलभतेने होण्यासाठी फार कडक किंवा अतिशय शिथिल करू नयेत, असे नमूद केले आहे. त्यामुळे वरील केंद्रीय दक्षता आयोग मार्गदर्शक तत्त्वांनुसार मंडळाने कामांचे मूल्य किंवा घटकांच्या पुरवठ्यासाठी योग्य पर्याय उपलब्ध करून दिले होते.

निविदेतील बोली लावलेल्या वस्तू सोडून इतर वस्तूंच्या पुरवठ्यातील निविदाकारांचा अनुभव विचारात घेऊन मंडळाने निविदा स्वीकारून मंजूर केल्याने हे उत्तर ग्राह्य धरले जात नाही. निविदेतील सुरक्षा आणि जीवनावश्यक संचातील वस्तूंपेक्षा वह्या, शाळेसाठी दप्तरे, शाळकरी मुलांना बूट-मोजे अशा वेगळ्या वस्तूंचा पुरवठा करण्यात या निविदाकारांचा अनुभव होता. अशा रीतीने निविदा अटींतील त्रुटीमुळे निविदाकारांचा अनुभव निश्चित करताना कार्यादेशाच्या किंमती मंडळाने विचारात घेतल्या तर नाहीच शिवाय निविदेत नमूद केलेल्या वस्तूंशी संबंधित नसलेल्या वस्तूंच्या पुरवठ्यातील अनुभवही ग्राह्य धरला.

6.4.2 एकाच लाभार्थ्याला अनेकदा संचाचे वितरण

कराराच्या अटीनुसार कंत्राटी अभिकरणांना संच वितरीत करणे आणि ज्या नोंदणीकृत कामगारांना संच देण्यात आलेत त्यांच्याकडून लेखी स्वरूपात वितरित संचाच्या पोच पावत्या प्राप्त करणे आवश्यक होते. कंत्राटी अभिकरणांनी नोंदणीकृत कामगाराची स्वाक्षरी, अंगठ्याचे ठसे, संच स्वीकारणाऱ्या लाभार्थ्यांची छायाचित्रे आणि मंडळाच्या प्राधिकृत नोडल अधिकाऱ्याची स्वाक्षरी घेणे आवश्यक होते.

31 मार्च 2022 पर्यंत राज्यात सुरक्षा आणि जीवनावश्यक संचांच्या वितरणावर अनुक्रमे ₹ 828.96 कोटी आणि ₹ 841.52 कोटी खर्च करण्यात आले होते. जुलै 2020 ते डिसेंबर 2021 दरम्यान नोंदणी केलेल्या 5.81 लाख कामगारांपैकी मार्च 2022 पर्यंत 1.37 लाख नोंदणीकृत कामगारांना (24 टक्के) सुरक्षा व जीवनावश्यक वस्तूंचे संच प्राप्त झाले नव्हते असे लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले.

संच वितरण मॉड्यूल' सुरू होण्यापूर्वी आणि 'संच वितरण मॉड्यूल' सुरू झाल्यानंतर 31 मार्च 2022 पर्यंतच्या संच वितरणाचा विदा मंडळाने उपलब्ध करून दिला होता.

लेखापरीक्षणात संच वितरण विदेच्या विश्लेषणातून खालील बाबी समोर आल्या.

- 401 लाभार्थ्यांना 802 जीवनावश्यक संचाचे दोनदा वितरण करण्यात आले.
- 12,215 लाभार्थ्यांना 24,430 सुरक्षा संचाचे दोन वेळा वाटप करण्यात आले. 18 लाभार्थ्यांना तीन वेळा सुरक्षा संचांचे वितरण करण्यात आले.

अशा प्रकारे, लाभार्थ्यांना ₹ 18.36 लाख किमतीचे (वस्तू व सेवा कर वगळून) जीवनावश्यक संच आणि ₹ 5.69 कोटींचे (वस्तू व सेवा कर वगळून) सुरक्षा संचांचे अनेकदा वितरण करण्यात आले.

उत्तरादाखल शासनाने नमूद केले की (जुलै 2024), अनेकदा संच पुरविलेल्या लाभार्थ्यांची यादी जिल्हा- निहाय वेगळी करण्यात आली असून जिल्हा अधिकारी व संबंधित विक्रेत्यांना पडताळणी अहवाल सादर करण्यासाठी कळविण्यात आले (डिसेंबर 2023) आहे.

6.4.3 पुनरावृत्ती आदेश देणे

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ऊर्जा व कामगार विभागाने डिसेंबर 2016 मध्ये जारी केलेल्या शासन निर्णयाद्वारे राज्यातील शासकीय विभागांमार्फत भांडार खरेदीसाठी सध्याच्या खरेदी धोरणात सुधारणा केली आहे. सुधारित धोरणानुसार पुनरावृत्ती आदेश एकदाच देता येतील आणि त्याचे प्रमाण आणि मूल्य प्रारंभिक आदेशाच्या 50 टक्के किंवा ₹10 कोटीं दोन्हीपैकी जे कमी असेल ते असावे. राज्याच्या खरेदी धोरणाचे उल्लंघन करत विभागाने **तक्ता 6.4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे सुरक्षा संच आणि जीवनावश्यक वस्तूंच्या संचासाठी मंडळाद्वारे सहा पुनरावृत्ती आदेश जारी करण्यास मान्यता दिली.

तक्ता 6.4: सुरक्षा आणि जीवनावश्यक संच वितरणासाठी जारी केलेले पुरवठा आदेश

विभागाने मान्यता दिलेली तारीख	पुरवठा आदेशाची तारीख	संख्या (लाखात)	
		सुरक्षा संच	जीवनावश्यक संच
09-04-2018	14-06-2018 (पहिला आदेश)	2.25	2.25
13-06-2019	14-06-2019	1.85	1.85
15-06-2019	05-08-2019	2.68	2.68
15-06-2019	16-08-2019	2.50	2.50
21-12-2019	04-01-2020	4.53	4.53
02-06-2021	11-06-2021	3.50	3.50
15-12-2021	23-12-2021	4.00	4.00
एकूण		**21.31**	**21.31**

स्त्रोत : विभागाने दिलेल्या मंजुरी आणि मंडळाने दिलेल्या पुरवठा आदेशावरून संकलित

विभागाने सुरक्षा संच आणि जीवनावश्यक संचासाठी अनुक्रमे ₹ 888.39 कोटी आणि ₹ 872.76 कोटीचे सहा पुनरावृत्ती आदेश देण्यास मान्यता दिली, जी सुरुवातीच्या मागणी आदेशापेक्षा 847 टक्के जास्त होती. **परिच्छेद 6.4** मध्ये नमूद केल्याप्रमाणे सुरक्षा व जीवनावश्यक संचाचा सुरुवातीचा खरेदी आदेश अनुक्रमे ₹ 104.87 कोटी व ₹ 103.03 कोटी होता.

उत्तरात, शासनाने नमूद केले की (जुलै 2024), प्रस्तावासाठी विनंतीच्या कलम 4.21 नुसार नोंदणीकृत कामगारांच्या पुढील नोंदणी/नूतनीकरणाच्या आधारे सुरक्षा आणि जीवनावश्यक संचांचा पुरवठा आणि वितरणासाठी वेळापत्रक आणि प्रमाण बदलण्याचा अधिकार मंडळाने राखून ठेवला आहे. नंतर असेही नमूद केले की, ज्या कामगारांना संच मिळाले नाहीत त्यांना संच वितरण करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केल्यामुळे मंडळाने ठराव संमत करून शासनाच्या मान्यतेनंतर कोणतीही दरवाढ न करता विक्रेत्यांना पुनरावृत्ती मागणी आदेश दिले.

उत्तर स्वीकारार्ह नाही कारण करारामध्ये वेळापत्रक आणि प्रमाण बदलण्याची तरतूद असली तरी विभागाच्या खरेदी धोरणानुसार पुनरावृत्ती आदेश देणे सुरुवातीच्या मागणी आदेशाच्या 50 टक्के किंवा ₹ 10 कोटी दोन्हीपैकी जे कमी असेल त्यापुरते मर्यादित

असणे आवश्यक होते. नव्याने निविदा मागवल्यानंतर अतिरिक्त गरजा पूर्ण करता आल्या असत्या.

6.5 आरोग्य तपासणी योजना

मंडळाने (जानेवारी 2019) सर्व सक्रिय नोंदणीकृत कामगारांसाठी असलेल्या आरोग्य तपासणी कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी हिंदुस्तान लटेक्ष लाइफकेअर लिमिटेड (भारत सरकारचा उपक्रम) यांना नियुक्त करण्याचा निर्णय घेतला. मंडळाने (फेब्रुवारी 2019) हिंदुस्तान लटेक्ष लाइफकेअर लिमिटेड सोबत एक करार केला जो एक वर्षासाठी वैध होता. वैद्यकीय तपासणीत कामगारांची शारीरिक तपासणी, फुफ्फुसांच्या कार्याची चाचणी, श्रवण चाचणी, दृष्टी तपासणी आणि इतर प्रयोगशाळा तपासण्यांचा समावेश होता. प्रत्येक बांधकाम कामगाराच्या वैद्यकीय तपासणीचा दर ₹ 1,950 होता. आरोग्य तपासणी कार्यक्रम फेब्रुवारी 2023 पर्यंत विस्तारीत करण्यात आला (डिसेंबर 2019). कार्यक्रमाच्या विस्तारात महिला बांधकाम कामगारांची स्तनाच्या कर्करोगाची तपासणी देखील समाविष्ट होती आणि प्रत्येक महिला बांधकाम कामगाराच्या तपासणीचे दर ₹ 2,355 होते. हिंदुस्तान लटेक्ष लाइफकेअर लिमिटेड संपूर्ण आरोग्य तपासणी कार्यक्रमाचे अद्यतनिकरण, पुनरावलोकन आणि देखरेखीसाठी क्लाउड-आधारित अनुप्रयोग विकसित आणि कार्यान्वित करण्यासाठी देखील जबाबदार होते.

2019-2020 ते 2021-2022 या कालावधीत 2.97 लाख नोंदणीकृत कामगारांची आरोग्य तपासणी करण्यासाठी या योजनेवर ₹ 59.19 कोटी[38] खर्च करण्यात आला.
या संदर्भात लेखापरीक्षणात खालील बाबी निदर्शनास आल्या.

- 2019-20 ते 2021-22 या कालावधीत राज्यात 19.49 लाख नोंदणीकृत कामगारांपैकी केवळ 2.97 लाख (15 टक्के) नोंदणीकृत कामगारांनी या योजनेचा लाभ घेतला. मुंबई शहर, ठाणे आणि मुंबई उपनगर जिल्ह्याच्या उपायुक्तांनी (अनुक्रमे फेब्रुवारी 2023, मार्च 2023, जून 2023) कोविड महामारीमुळे कमी व्याप्ती, स्थलांतरामुळे वैद्यकीय शिबिराच्या ठिकाणी नोंदणीकृत कामगारांची अनुपलब्धता, बांधकामात अडथळा येईल या भीतीने बांधकाम कार्यस्थळ व्यवस्थापकाचा वैद्यकीय शिबिर घेण्यास नकार/अनुत्साह इत्यादी कारणे दिली.
- कंत्राट करारानुसार नमुने गोळा केल्याच्या तारखेपासून तीन दिवसांच्या आत चाचणी अहवाल कामगारांना देणे बंधनकारक होते. हिंदुस्तान लटेक्ष लाइफकेअर लिमिटेडने चाचणी अहवाल मिळाल्याबद्दल कामगारांकडून तीन प्रतींत पोचपावत्या गोळा करणे आणि प्रदानासाठी मासिक देयकांसह मूळ प्रत जिल्हा कार्यालयात सादर करणे आवश्यक होते. प्रदानांच्या मासिक पोचपावत्यांसह अशी पावती सादर करण्यात आली नसल्याचे लेखापरीक्षण पडताळणीत निष्पन्न झाले. तशी पावती नसल्याने चाचणी अहवाल किती कामगारांना देण्यात आले, याची माहिती मिळू शकली नाही.

[38] 2019-20: ₹ 7.14 कोटी; 2020-21: ₹ 17.65 कोटी आणि 2021-22: ₹ 34.40 कोटी

उत्तरादाखल शासनाने नमूद केले की (जुलै 2024), शिबिराच्या ठिकाणी लाभार्थ्यांना चाचणी अहवाल देण्यात येत असून, कामगारांना हिंदुस्तान लटेक्ष लाइफकेअर लिमिटेडच्या संकेतस्थळावरून अहवाल डाऊनलोड करता यावा, यासाठी मंडळाकडे नोंदणीकृत मोबाइल क्रमांकावर लाभार्थ्यांना एसएमएस लिंक देण्यात आली आहे. निर्गमन परिषदेत (जुलै 2024) मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी असे नमूद केले की, पोचपावत्या आता प्राप्त होत आहेत.

6.6 कोविड महामारीच्या काळात देण्यात आलेली आर्थिक मदत

कोविड-19 दरम्यान सहाय्य या योजनेतंर्गत कोविड महामारीच्या काळात सर्व सक्रीय नोंदणीकृत कामगारांना विभागाने (एप्रिल 2020) प्रति लाभार्थी ₹ 2,000 आर्थिक मदत मंजूर केली. ही मदत लाभार्थ्याच्या बँक खात्यात हस्तांतरित करण्यात येणार होती. मंडळाने (एप्रिल 2020) जिल्हा कार्यालयांना लाभार्थ्यांच्या देयकांवर प्रक्रिया करण्यासाठी एक्सेल शीटमध्ये विहित नमुन्यात नोंदणीकृत कामगारांचा तपशील सादर करण्याचे निर्देश दिले. मिळालेल्या माहितीवर एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणालीचे व्यवस्थापन करणाऱ्या अभिकरणाने (मेसर्स अर्सेयास इंफोटेक लिमिटेड यांच्या सहकार्याने मेसर्स आयटीआय लिमिटेड ने) नकली लाभार्थी ओळखणे, आयएफएससी कोडची अचूकता पडताळणे इत्यादींवर प्रक्रिया केली आणि ती मंडळाकडे सादर केली. मंडळाने मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची मान्यता घेतल्यानंतर लाभार्थ्यांच्या बँक खात्यात आर्थिक मदत वितरित करण्यासाठी एक्सेल फाईल ई-मेलद्वारे बँकेकडे (सेंट्रल बँक ऑफ इंडिया) पाठविली. मंडळाने दिलेल्या माहितीनुसार, एप्रिल 2020 ते मार्च 2022 या कालावधीत 10.28 लाख लाभार्थ्यांना ₹ 205.53 कोटी वितरित करण्यात आले.

दुसऱ्या टप्प्यात, विभागाने ज्यांना पहिल्या टप्प्यात अर्थसहाय्य केले होते अशा लाभार्थ्यांना प्रति लाभार्थी ₹ 3,000 आर्थिक मदत मंजूर (ऑगस्ट 2020) केली. मंडळाने दिलेल्या माहितीनुसार, ऑगस्ट 2020 ते मार्च 2022 या कालावधीत 9.96 लाख लाभार्थ्यांना ₹ 298.71 कोटी वितरित करण्यात आले.

तिसऱ्या टप्प्यात विभागाने सर्व सक्रिय नोंदणीकृत लाभार्थ्यांना प्रति लाभार्थी ₹ 1,500 आर्थिक सहाय्य मंजूर (एप्रिल 2021) केले. मंडळाने दिलेल्या माहितीनुसार, मंडळाने एप्रिल 2021 ते ऑक्टोबर 2021 या कालावधीत 10.56 लाख लाभार्थ्यांना ₹ 158.37 कोटी वितरित केले. अशा प्रकारे, मार्च 2022 पर्यंत लाभार्थ्यांना ₹ 662.61 कोटी वितरीत करण्यात आले.

लेखापरिक्षणादरम्यान अतिरिक्त प्रदानाची प्रकरणे निदर्शनास आली जी पुढील परिच्छेदात चर्चिली आहेत.

6.6.1 प्रति लाभार्थी ₹ 2,000 चे आर्थिक साहाय्य देणे

लेखापरीक्षणात प्रत्येक लाभार्थ्याला ₹ 2,000 चे वितरण झाल्याच्या बँक व्यवहारांच्या विदेचे विश्लेषण केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या:

- **तक्ता 6.5** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 32,018 प्रकरणांत समान बँक खाते क्रमांक व खातेधारकाचे ही समान नाव असलेल्या बँक खात्यांना एकापेक्षा अधिक वेळा प्रति लाभार्थी ₹ 2,000 वितरण करण्यात आले.

तक्ता 6.5: समान बँक खाते क्रमांक असलेल्या खात्यांत वितरण

बँक खात्यांची संख्या	प्रदानांची संख्या	एकूण प्रकरणे	अतिरिक्त प्रदानांची संख्या	अतिरिक्त प्रदान (₹ लाखात)
1	2	3	4 (3-1)	5
1	6	6	5	0.10
4	5	20	16	0.32
109	4	436	327	6.54
306	3	918	612	12.24
15319	2	30638	15319	306.38
		32018	**16279**	**325.58**

स्त्रोत: मंडळाने सादर केलेल्या बँक व्यवहारांच्या विदेच्या विश्लेषणाच्या आधारे संकलित

समान बँक खाते क्रमांक असलेल्या खात्यांत वितरण झाल्यामुळे ₹ 3.26 कोटी जादा भरले गेले.

उत्तरात, शासनाने नमूद केले की (जुलै 2024), बँकेकडून प्राप्त झालेल्या व्यवहारांच्या सक्सेस अहवालाची पडताळणी सुरू असून त्या पडताळणी नंतर योग्य ती कारवाई केली जाईल.

6.6.2 प्रति लाभार्थी ₹ 3,000 चे आर्थिक साहाय्य प्रदान करणे

ज्या लाभार्थ्यांचे पहिल्या टप्प्याचे बँक व्यवहार यशस्वीपणे पार पडले आहेत, अशा सर्व लाभार्थ्यांना ₹ 3000 /- अर्थसहाय्य देण्याचे निर्देश मंडळाने सेंट्रल बँक ऑफ इंडियाला दिले होते. लेखापरीक्षणात प्रति लाभार्थी ₹ 2,000 वितरित करून प्रति लाभार्थी ₹ 3,000 वितरण दर्शविलेल्या बँक व्यवहारांच्या विदेचे विश्लेषण केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या:

- 1,20,764 लाभार्थ्यांना पहिल्या टप्प्यातील ₹ 2,000 चे अर्थसहाय्य देऊनही ₹ 3,000 देण्यात आले नाहीत.
- 15,920 लाभार्थ्यांना पहिल्या टप्प्यातील ₹ 2,000 चे अर्थसहाय्य देण्यात आले नसतांनाही ₹ 3,000 देण्यात आले.

तक्ता 6.6 मध्ये दर्शविल्याप्रमाणे 7,394 प्रकरणांत समान बँक खाते क्रमांक (बँक खातेधारकाचे नाव एकच होते) असलेल्या बँक खात्यांत प्रति लाभार्थी ₹ 3,000 एकापेक्षा जास्त वेळा वितरित करण्यात आले.

तक्ता 6.6: समान बँक खाते क्रमांक असलेल्या खात्यांत वितरण

बँक खात्यांची संख्या	प्रदानांची संख्या	एकूण प्रकरणे	अतिरिक्त प्रदानांची संख्या	अतिरिक्त प्रदान (₹ लाखात)
1	2	3	4 (3-1)	5
2	6	12	10	0.30
2	5	10	8	0.24
22	4	88	66	1.98
12	3	36	24	0.72
3,624	2	7,248	3,624	108.72
		7,394	**3,732**	**111.96**

स्त्रोत: मंडळाने सादर केलेल्या बँक व्यवहारांच्या विदेच्या विश्लेषणाच्या आधारे संकलित

- समान बँक खाते क्रमांक असलेल्या खात्यांत वितरण झाल्याने ₹1.12 कोटी जादा प्रदान केले गेले.

उत्तरादाखल शासनाने नमूद केले की (जुलै 2024), विभागीय कार्यालयांच्या सेवा प्रदाता कडून मिळालेली माहिती आणि बँकेकडून प्राप्त झालेल्या व्यवहारांच्या सक्सेस अहवालांची पडताळणी सुरू असून ती अंतिम झाल्यानंतर आवश्यक ती कार्यवाही केली जाईल.

6.6.3 प्रति लाभार्थी ₹ 1,500 चे आर्थिक साहाय्य प्रदान करणे

विभागाने निर्देश दिले की (एप्रिल 2021), प्रति लाभार्थी ₹ 1,500 केवळ सक्रिय नोंदणीकृत लाभार्थ्यांनाच देण्यात यावेत.

लेखापरीक्षणात 4,336 प्रकरणांमध्ये समान बँक खाते क्रमांक (खातेधारकाचे नाव एकच होते) असलेल्या बँक खात्यांमध्ये प्रति लाभार्थी ₹ 1,500 दोन वेळा वितरित करण्यात आल्याने ₹ 65.04 लाख अतिरिक्त प्रदान केल्याचे निदर्शनास आले.

उत्तरादाखल शासनाने असे नमूद केले (जुलै 2024) की, मंडळाकडून प्राप्त झालेल्या व्यवहारांच्या सक्सेस अहवालाची पडताळणी केली असता ₹ 42.35 लाख वसूल केल्याचे निदर्शनास आले असून संबंधित खातेदारांकडून वसुलीसाठी बँकेशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

अशा प्रकारे, कोविड 19 च्या काळात अनुक्रमे ₹ 2000, ₹ 3000 आणि ₹ 1500 यांच्या आर्थिक मदतीच्या वितरणात ₹ 5.03 कोटींचे[39] अतिरिक्त प्रदान एकापेक्षा जास्त वेळा लाभ वितरित केल्यामुळे मंडळाकडून पुरेशी पडताळणी झाली नाही आणि बँकेशी ताळमेळ घेतला गेला नाही हे दर्शवते.

निर्गमन बैठकीत प्रधान सचिवांनी नमूद केले की (जुलै 2024), या प्रणालीतील त्रुटी आहेत आणि या प्रदानांचा ताळमेळ घेतला जाईल आणि वसुलीसाठी प्रयत्न केले जातील.

6.7 थेट लाभ हस्तांतरणांतर्गत दाव्यांचा निपटारा

थेट लाभ हस्तांतरण योजनांमध्ये शैक्षणिक मदत, कामगार मृत्यू भरपाई योजनांचा समावेश होता.

एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणाली (जुलै 2020) सुरू होण्यापूर्वी विविध योजनांतर्गत लाभार्थ्यांचे दावे जिल्हा कार्यालयात प्रत्यक्ष प्राप्त होते जे जिल्हा कामगार कार्यालयातील सहाय्यक कामगार अधिकारी मंजूर करत होते. मंजुरीनंतर लाभार्थ्यांच्या बँक खात्यात पैसे वर्ग करण्यात येत होते. त्यानंतर एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणाली सुरू झाल्यानंतर लाभार्थ्यांनी एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणालीच्या माध्यमातून आधारभूत कागदपत्रांसह विविध योजनांच्या लाभासाठी अर्ज केले. दाव्याला मंजुरी मिळाल्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी देयकास मान्यता

[39] ₹ 3.26 कोटी + ₹ 1.12 कोटी + ₹ 0.65 कोटी = ₹ 5.03 कोटी

दिली आणि प्रत्येक लाभार्थ्याला करावयाच्या देयकांची एक्सेल फाईल प्रदांनासाठी बँकेकडे पाठविण्यात आली. एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणाली लागू करण्यापूर्वीचे प्रलंबित दावे (वारसा विदा) देखील प्रणालीमध्ये नोंद केले गेले.

6.7.1 दाव्यांच्या निपटाऱ्यासाठी लागणाऱ्या कालावधीचे विश्लेषण

लेखापरीक्षणाने थेट लाभ हस्तांतरण अंतर्गत 26 योजनांच्या दाव्यांच्या निपटाऱ्यासाठी लागणाऱ्या कालावधीचे केलेले विश्लेषण **तक्ता 6.7** मध्ये दर्शविले आहे.

तक्ता 6.7: लाभार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या दाव्यांचा निपटारा करण्याची स्थिती (सप्टेंबर 2023 रोजी)

अनु. क्र.	तपशील	मार्च 2022 अखेरीपर्यंत प्राप्त दाव्यांची संख्या (सप्टेंबर 2023 पर्यंतची स्थिती)
1	एकूण प्राप्त दावे	5,94,313
2	दावे प्रलंबित	15,346
3	दावे फेटाळले	2,31,864
4	दावे निकाली निघाले	3,47,103
दावे मंजूर होण्यास लागलेला वेळ		
अ	एक ते दोन वर्षे	1,17,153(19.71 टक्के)
ब	दोन ते तीन वर्षे	73,413 (12.35 टक्के)
क	तीन ते चार वर्षे	15,142 (2.54 टक्के)
ड	चार वर्षांपेक्षा जास्त	3,881 (0.65 टक्के)

स्त्रोत: एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणालीमध्ये उपलब्ध विदाचे विश्लेषण

प्राप्त दावे मंजूर करण्यासाठी मंडळाने कोणतीही कालमर्यादा निश्चित केलेली नव्हती. 60 टक्के दावे एक वर्षानंतर मंजूर झाल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले. तर, दुसऱ्या बाजूला असेही निदर्शनास आले की, उपस्थित केलेल्या प्रश्नांची सात दिवसांत उकल करण्यात कामगारांना अपयश आल्याने यंत्रणेने कामगारांचे दावे फेटाळून लावले.

तक्ता 6.7 वरून असे निदर्शनास आले की, सप्टेंबर 2023 पर्यंत 15,346 दावे (तीन टक्के) प्रलंबित होते, त्यापैकी 36 टक्के दावे दोन वर्षांहून अधिक काळ प्रलंबित होते. ज्या जिल्ह्यांमध्ये प्रलंबित दाव्यांची संख्या जास्त आहे किंवा कोणत्या जिल्ह्यात प्राप्त झालेल्या दाव्यांना मंजुरी देण्यास बराच उशीर झाला आहे, अशा जिल्ह्यांची ओळख पटविण्यासाठी मंडळाकडून देखरेख करण्यात आली नाही. उत्तरादाखल शासनाने नमूद केले की (जुलै 2024), मंडळाने (ऑक्टोबर 2023) दाव्यांचा निपटारा करण्यासाठी सर्वसमावेशक सूचना जारी केल्या आहेत ज्यामुळे दाव्यांची प्रलंबितता एक ते दोन महिन्यांनी कमी झाली आहे आणि (नोव्हेंबर 2023) जिल्हा अधिकाऱ्यांना क्षुल्लक कारणास्तव दावे न फेटाळण्याचे निर्देश देखील दिले आहेत. सर्व कामगार सुविधा केंद्र मधील प्रलंबित दाव्यांचा पाठपुरावा आणि देखरेख केली जात असल्याचे ही सांगण्यात आले.

प्रलंबित दाव्यांची संख्या कमी करण्यासंदर्भातील शासनाच्या उत्तराची पडताळणी करण्यासाठी लेखापरीक्षणात मार्च 2024 पर्यंत प्राप्त झालेल्या दाव्यांच्या विदेचे विश्लेषण करण्यात आले ज्यात असे निदर्शनास आले की सप्टेंबर 2023 अखेरीस 15,346 असलेल्या प्रलंबित दाव्यांच्या तुलनेत ऑक्टोबर 2024 अखेरीस 1,39,159 दावे (प्राप्त

झालेल्या एकूण दाव्यांच्या 6.81 टक्के) प्रलंबित होते. त्यामुळे प्रलंबित दाव्यांमध्ये कोणतीही घट झालेली नाही.

6.7.2 दस्तऐवजांच्या अयोग्य पडताळणीमुळे जादा प्रदान

एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणाली मध्ये प्रत्येक प्रकारच्या योजनेसाठी मॉड्यूल उपलब्ध आहेत. लाभार्थी संबंधित योजनेच्या मॉड्यूलमध्ये विदा प्रविष्ट करतो. ई-05 शैक्षणिक योजनेच्या बाबतीत मागील शैक्षणिक वर्षाची गुणपत्रिका/ चालू शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतल्याचे प्राचार्यांचे प्रमाणपत्र/ सत्यता प्रमाणपत्र असे दस्तऐवज प्रणालीवर अपलोड करणे आवश्यक होते आणि त्या योजनांतर्गत अनुदान मंजूर करण्यापूर्वी दस्तऐवजाची पडताळणी करण्यासाठी नोंदणी अधिकारी जबाबदार होते.

यादृच्छिक पद्धतीने निवडलेल्या 50 अर्जांची तपासणी केली असता खालील अनियमितता निदर्शनास आल्या:

(i) ई-05 योजनेशी[40] संबंधित अर्जांची पडताळणी केली असता असे निदर्शनास आले की, अनुक्रमे अभियांत्रिकी व वैद्यकीय पदवीच्या पदवी अभ्यासक्रमासाठी विद्यार्थीदशेतील मुलांचा विचार करून @ ₹ एक लाख व ₹ 60,000 रक्कम दिली गेली असली तरी त्याच्या समर्थनार्थ सादर केलेले दस्तऐवज वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रम (ई-06 योजना) सोडून पदविका अभ्यासक्रम आणि पदवी/ पदव्युत्तर शिक्षणाशी संबंधित होते जे @ ₹ 20,000 व ₹ 25,000 आर्थिक सहाय्याकरिता पात्र होते. परिणामी, **तक्ता 6.8** मध्ये दर्शविल्याप्रमाणे ज्यादा प्रदान केले गेले.

तक्ता 6.8: दस्तऐवजांच्या अयोग्य पडताळणीमुळे ज्यादा प्रदान

प्रकरणांची संख्या	ज्या योजनेंतर्गत केलेले अर्ज आणि प्रदान रक्कम	संलग्न दस्तऐवजांनुसार लागू होणारी योजना	प्रदान केलेली रक्कम (₹ लाखात)	सादर केलेल्या दस्तऐवजांनुसार देय रक्कम (₹ लाखात)	जादा प्रदान (₹ लाखात)
9	अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमासाठी लाभार्थ्यांच्या विद्यार्थीदशेतील मुलांना आर्थिक मदत - प्रति लाभार्थी ₹ 60,000	पदविका अभ्यासक्रम - प्रति लाभार्थी ₹ 20,000	5.40	1.80	3.60
21	वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमासाठी लाभार्थ्यांच्या विद्यार्थीदशेतील मुलांना आर्थिक मदत - प्रति लाभार्थी ₹ एक लाख	वैद्यकीय व अभियांत्रिकी वगळता इतर पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रम - प्रति लाभार्थी ₹ 25,000	21.00	5.25	15.75
		एकूण			**19.35**

स्त्रोत एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणालीत अपलोड केलेले दस्तऐवज

[40] लाभार्थ्यांच्या विद्यार्थीदशेतील मुलांसाठी वैद्यकीय आणि अभियांत्रिकी मधील पदवी अभ्यासक्रमाकरिता आर्थिक सहाय्य

त्यामुळे जिल्ह्यातील बांधकाम कामगारांच्या नोंदणी अधिकाऱ्यांकडून योग्य छाननी न झाल्याने ₹ 19.35 लाख जादा भरले गेले.

(ii) ई -05 शैक्षणिक योजनेच्या त्याच 50 अर्जांच्या संदर्भात प्रणालीत प्रविष्ट केलेल्या दस्तऐवजांची चाचणी-तपासणी केली असता दावा अर्जासह प्रविष्ट केलेल्या दस्तऐवजांमध्ये खालील विविध विसंगती आढळून आल्या.

- उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेच्या (इयत्ता बारावी) प्रमाणपत्रांवर एकच आसन क्रमांक आणि अनुक्रम क्रमांक होता. फक्त नाव बदलले होते: 26 प्रकरणे.
- पदवी अभ्यासक्रमाच्या सत्र परीक्षेच्या गुणांच्या विवरणपत्रावर एकच आसन क्रमांक आणि वैयक्तिक नोंदणी क्रमांक होता परंतु नावात बदल होता: 2 प्रकरणे.
- एका प्रकरणात अर्जदाराने 2018 मध्ये बॅचलर ऑफ डेंटल सर्जरी (बीडीएस) साठी अर्ज केला होता. अर्जासोबत जोडलेल्या प्रमाणपत्रांमध्ये 2021 मध्ये उत्तीर्ण होण्याचे वर्ष दर्शविणारे उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र आणि 2018 मध्ये प्रथम वर्ष बीडीएस अभ्यासक्रमासाठी योगिता डेंटल कॉलेज व रुग्णालयाने दिलेले सत्यता प्रमाणपत्र होते. अशाप्रकारे, उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्राच्या तारखेपूर्वी सत्यता प्रमाणपत्राची तारीख होती. लाभार्थ्याला ₹ एक लाख वितरित करण्यात आले.

प्रविष्ट केलेल्या दस्तऐवजांमधील विसंगती पाहता ज्या प्रविष्ट दस्तऐवजांच्या आधारे दावे मंजूर करण्यात आले, त्यांची सत्यता संशयास्पद वाटत होती.

निर्गमन बैठकीत (जुलै 2024) प्रधान सचिवांनी सांगितले की, शालेय शिक्षण विभागाने विकसित केलेल्या सरल प्रणालीशी एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणालीला जोडण्याचा प्रयत्न केला जात आहे ज्यामध्ये विद्यार्थ्यांची नावे आधारशी जोडली गेली आहेत.

6.8 अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण)

ग्रामीण भागातील नोंदणीकृत (सक्रिय) बांधकाम कामगारांना घरबांधणीसाठी आर्थिक सहाय्य देण्यासाठी विभागाने अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) मंजूर केली (जानेवारी 2019). या योजनेंतर्गत लाभार्थी/पती/पत्नीच्या नावे असलेल्या जमिनीवर नवीन घर बांधण्यासाठी (घराचे किमान बांधकाम क्षेत्र 269 चौरस फूट) किंवा तात्पुरते घर (कच्चे घर) कायमस्वरूपी घरामध्ये (पक्के घर) रूपांतरित करण्यासाठी ₹ 1.50 लाख अर्थसहाय्य देण्यात येणार होते. बांधकाम पूर्ण झाल्यावर लाभार्थ्याला आणखी ₹ 50,000 देय होते. अशा प्रकारे या योजनेअंतर्गत प्रत्येक लाभार्थ्याला एकूण ₹ दोन लाख अर्थसाहाय्य देण्यात आले. या योजनेंतर्गत निधीचे वितरण मंडळातर्फे ग्रामीण विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष यांना करण्यात आले.

या योजनेनुसार, आर्थिक मदतीसाठी अर्जांची छाननी करण्याकरीता जिल्हास्तरीय लाभार्थी निवड समिती[41] स्थापन करण्यात आली होती. या योजनेंतर्गत आर्थिक मदत वाटपासाठी निवड झालेल्या लाभार्थ्यांची यादी जिल्हास्तरीय लाभार्थी निवड समितीने राज्य व्यवस्थापन कक्षाकडे सादर केली होती. त्यानुसार संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष यांनी थेट लाभार्थ्यांना निधी दिला.

मंडळाने राज्य व्यवस्थापन कक्षाने सादर केलेल्या आवश्यकतेनुसार राज्यातील एक लाख घरांच्या बांधकामासाठी ₹ 104 कोटी राज्य व्यवस्थापन कक्षाकडे हस्तांतरित केले (फेब्रुवारी 2019). जिल्हास्तरीय लाभार्थी निवड समितीने जुलै 2019 ते ऑक्टोबर 2023 दरम्यान 382 घरांच्या बांधकामास मंजुरी दिली असून नोव्हेंबर 2023 पर्यंत त्यापैकी 216 घरांचे बांधकाम पूर्ण झाले असून 166 घरांचे बांधकाम प्रगतीपथावर असल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले. जिल्हास्तरीय लाभार्थी निवड समितीने 382 घरांना मंजुरी दिल्याचा विचार करता लाभार्थ्यांना देय असलेली आर्थिक मदत ₹ 7.64 कोटी होती राज्य व्यवस्थापन कक्षाच्या संचालकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ऑक्टोबर 2023 पर्यंत राज्य व्यवस्थापन कक्षाकडून लाभार्थ्यांना ₹ 3.69 कोटी देण्यात आले. मात्र, उर्वरित ₹ 114.49 कोटी[42] (अखर्चित रकमेवरील ₹ 18.13 कोटी व्याजासह) संचालक, राज्य व्यवस्थापन कक्षाने मंडळाला परत करण्याऐवजी ठेवून घेतली.

उत्तरादाखल शासनाने नमूद केले की (जुलै 2024), ऑक्टोबर 2020, जुलै 2021 आणि जुलै 2023 मध्ये मंडळाने राज्य व्यवस्थापन कक्ष (ग्रामीण गृहनिर्माण) यांना वापरात नसलेला निधी परत करण्यास कळवले होते, परंतु हा निधी परत करण्यात आला नाही (जुलै 2024).

6.9 अटल बांधकाम कामगार आवास योजना (शहरी)

महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार (फेब्रुवारी 2018) राज्यात राबविण्यात आलेली अटल बांधकाम कामगार आवास योजना प्रधानमंत्री आवास योजनेच्या (शहरी)[43] पात्रता अटींची[44] पूर्तता करणाऱ्या नोंदणीकृत बांधकाम कामगारांसाठी ही लागू करण्यात आली. अटल बांधकाम कामगार आवास योजना (शहरी) अंतर्गत पात्र असणारे लाभार्थी मंडळाकडून ₹ दोन लाख अतिरिक्त

---

[41] समितीचे अध्यक्ष म्हणून अतिरिक्त कामगार आयुक्त, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक आणि जिल्हा कार्यकारी अधिकारी हे सदस्य म्हणून आणि मंडळाचे उप-जिल्हा कार्यकारी अधिकारी हे सदस्य सचिव होते.

[42] ₹ 104 - ₹ 7.64 कोटी देय + व्याज ₹ 18.13 कोटी= ₹ 114.49 कोटी

[43] 2022 पर्यंत सर्व पात्र कुटुंबे/ लाभार्थ्यांना घरे उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनाने 2015 मध्ये प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) सुरू केली. या योजनेअंतर्गत केंद्र शासन आणि राज्य शासनाकडून अनुक्रमे ₹ 1.50 लाख आणि ₹ एक लाखाचे अनुदान देण्यात आले.

[44] लाभार्थी कुटुंबाकडे (पती, पत्नी आणि अविवाहित मुले आणि/किंवा अविवाहित मुलींचा समावेश असलेले कुटुंब) स्वतःच्या नावावर किंवा भारताच्या कोणत्याही भागात कुटुंबातील कोणत्याही सदस्याच्या नावावर पक्के घर (सर्व हवामानात टिकणारे घर) नसावे, वार्षिक उत्पन्न तीन लाखांपर्यंत इ.

अनुदानासाठी ही पात्र असतात. मंडळाने इच्छुक आणि पात्र नोंदणीकृत कामगारांसाठी अटल बांधकम कामगार आवास योजना (शहरी) अंतर्गत ₹ दोन लाख अनुदान अंमलबजावणी अभिकरण असलेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) चे अभियान संचालक, प्रधान मंत्री आवास योजना (शहरी) यांना दिले. ही घरे खासगी विकासकांकडून बांधली जाणार होती, ज्यांच्या प्रकल्पांना केंद्र गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार मंत्रालयाच्या केंद्रीय मंजुरी आणि देखरेख समितीने मंजुरी दिली होती. प्रधान मंत्री आवास योजना (शहरी) मार्गदर्शक तत्त्वांमध्ये निश्चित केलेल्या निकषांनुसार विकासकांना हप्त्यांमध्ये निधी दिला जातो.

मंडळाने मे 2021 ते जुलै 2022 या कालावधीत (662 लाभार्थी) **तक्ता 6.9** मध्ये दर्शविल्या प्रमाणे तीन विकासकांना[45] वाटपासाठी ₹ 13.24 कोटी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाला दिले.

तक्ता 6.9: अटल बांधकाम कामगार आवास योजना (शहरी) अंतर्गत निधी वाटप

अनु. क्र.	जिल्हा	नोंदणीकृत कामगारांची संख्या	मंडळाने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाला दिलेली रक्कम (वाटपाचा कालावधी)	महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाकडून विकासकाला ज्या लाभार्थ्यांसाठी वाटप करण्यात आले, त्यांची संख्या	वाटप केलेली रक्कम आणि वाटपाचा कालावधी
1	बीड	106	2.12 कोटी (मे 2021 ते मार्च 2022)	106	₹ 1.69 कोटी ऑक्टोबर 2021 आणि नोव्हेंबर 2022
2	सोलापूर	321	6.42 कोटी (फेब्रुवरी 2021)	278	₹ 5.56 कोटी मे 21 आणि ऑक्टोबर 2021 दरम्यान
3	सोलापूर	235	4.70 कोटी (नोव्हेंबर 2021)	219	₹ 1.75 कोटी एप्रिल 2022 मध्ये
		662	**13.24**	**603**	
* प्रकल्पाच्या बांधकामाच्या टप्प्यानुसार महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाने विकासकांना वाटप केलेली रक्कम					

मंडळाने दिलेली माहिती आणि महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाकडून संकलित केलेल्या माहितीच्या आधारे लेखापरीक्षणात खालील बाबी आढळून आल्या:

- मंडळाने नेमून दिलेल्या वितरणानुसार महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाने वितरित केलेल्या रकमेचा त्रैमासिक अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक होते. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाकडून त्रैमासिक अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले जात नाहीत तसेच मंडळाने मागणी केली नसल्याचे ही लेखापरीक्षणात निदर्शनास आले. शिवाय घरे देण्यात आलेल्या लाभार्थ्यांची संख्या, वितरण रद्द करण्यात आलेल्या प्रकरणांची संख्या याचा

[45] बीड जिल्हा : वैष्णवी कॉटन इंडस्ट्रीज; सोलापूर जिल्हा : राजेंद्र सुखदेव मिरगणे आणि आरएसएम युनिटी विकासक

अहवाल महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाकडून मंडळाला मिळालेला नाही.

- सोलापूर जिल्ह्यात मंडळातर्फे ज्या 556 लाभार्थ्यांसाठी निधी देण्यात आला, त्यापैकी 497 लाभार्थ्यांचा निधी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाने दोन विकासकांना (तक्ता 6.9 मधील अनु.क्र. 2 व 3) दिला. ₹ 118 लाखांचा अवितरित निधी (59 लाभार्थ्यांना ₹ दोन लाख दराने) मंडळाने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाकडे मागितला नाही.
- ज्या 278 लाभार्थ्यांसाठी (तक्ता 6.9 मधील अनु. क्र.2) विकासकाला निधी देण्यात आला, त्यापैकी 26 लाभार्थ्यांचे वाटप रद्द करण्यात आले. मात्र, ₹ दोन लाख दराने या 26 लाभार्थ्यांसाठी देण्यात आलेल्या ₹ 52 लाखांच्या निधीची मागणी मंडळ/महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाने विकासकाकडे केली नव्हती.
- 577 लाभार्थ्यांपैकी (603 वजा 26 रद्द वाटप) विकासकाने केवळ 161 लाभार्थ्यांच्या बाबतीत करार (नोंदणीकृत कामगारांना घरांचे वाटप दर्शविणारे) केल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले. 416 लाभार्थ्यांशी करार न करण्याची कारणे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाकडून प्रतिक्षित होती. नोव्हेंबर 2023 पर्यंत 577 लाभार्थ्यांपैकी एकाही लाभार्थाला या योजनेअंतर्गत घरांचे वाटप करण्यात आले नाही.

उत्तरात, शासनाने नमूद केले (जुलै 2024) की, मंडळाने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाला निधीच्या वापराचा नियमित अहवाल, वितरित निधीचे वार्षिक वापर प्रमाणपत्र सादर करण्याचे आणि अखर्चित रक्कम व्याजासह मंडळाकडे पाठविण्याचे कळविले आहे (मे 2024). निर्गमन बैठकीमध्ये (जुलै 2024) प्रधान सचिवांनी नमूद केले की, दोन्ही अंमलबजावणी अभिकरणांना विभाग स्तरावर अखर्चित शिल्लक मंडळाला परत करण्याची आठवण करून दिली जाईल.

6.10 सामाजिक अंकेक्षण

रिट याचिका (दिवाणी) क्रमांक 318/2006 मध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार (19 मार्च 2018) केंद्र शासनाच्या श्रम आणि रोजगार मंत्रालयाने इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियमाच्या अंमलबजावणीचे सामाजिक अंकेक्षण[46] करण्यासाठी सर्व राज्ये/केंद्रशासित प्रदेशांना सामाजिक अंकेक्षण चौकट आखून दिली होती. इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियमाच्या प्रभावी आणि अर्थपूर्ण अंमलबजावणीसाठी भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांनी विकसित केलेल्या

---

[46] सामाजिक अंकेक्षण हे एक लेखापरीक्षण आहे जे लोकांद्वारे केले जाते, विशेषत: त्या लोकांद्वारे जे लोक लेखापरीक्षण होणाऱ्या योजनांचे लाभार्थी आहेत आणि शासनाच्या सुविधांद्वारे प्रभावित आहेत किंवा त्यांच्यावर त्यांचा (योजनांचा) विपरीत परिणाम झाला आहे. ही सामाजिक अंकेक्षणाची प्रक्रिया ही शासनाच्या निधीचा वापर योग्य होतो आहे का आणि नागरिकांच्या जीवनात बदल होतो आहे का हे तपासण्यासाठी आहे.

सामाजिक अंकेक्षणाच्या लेखापरीक्षण मानकांनुसार इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियमाच्या अंमलबजावणीचे सामाजिक अंकेक्षण राज्य शासनाद्वारे केले जावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. सामाजिक अंकेक्षण चौकटीनुसार, प्रत्येक गट (ग्रामीण भाग) आणि प्रभाग (शहरी भाग) या मध्ये राज्य आणि जिल्हा स्तरावर सुरू असलेल्या बांधकाम क्षेत्र, कामगार छावण्या, कामगार चौक, मंडळे कार्यालयांना भेट देऊन सामाजिक अंकेक्षण केले जाणार होते, जेणेकरून एखाद्या राज्यातील सर्व प्रभाग आणि/किंवा गट दोन वर्षांच्या कालावधीत समाविष्ट केले जातील.

कल्याणकारी योजनांचे सामाजिक अंकेक्षण करण्याचा ठराव मंडळाने मंजूर केल्याचे (जून 2021) निदर्शनास आले. मार्च 2022 मध्ये मंडळाने सामाजिक अंकेक्षण करण्याचा प्रस्ताव विभागाकडे पाठविल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले. परंतु, मंडळाच्या कल्याणकारी योजनांचे सामाजिक अंकेक्षण जून 2024 पर्यंत करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले.

उत्तरात, शासनाने नमूद केले की (जुलै 2024), महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण आणि पारदर्शकता सोसायटीच्या माध्यमातून 2020-21 ते 2022-23 या कालावधीत बांधकाम कामगारांना जास्तीत जास्त लाभ वितरित करण्यात आलेल्या 10 योजनांच्या संदर्भात प्रत्येक विभागातील दोन जिल्ह्यांमध्ये सामाजिक अंकेक्षण करण्यास विभागाने मान्यता दिली आहे (जुलै 2024) आणि सामाजिक अंकेक्षण करण्याची प्रक्रिया प्रगतिपथावर आहे.

निष्कर्ष

2017-18 ते 2021-22 या कालावधीत उपकर संकलन ₹ 7,689.73 कोटी होते. मंडळाने 2017-18 ते 2021-22 या कालावधीत योजनांच्या अंमलबजावणीसाठी एकूण उपलब्ध निधीपैकी (म्हणजे ₹ 16,151.82 कोटी) फक्त ₹ 4,253.77 कोटी (26.34 टक्के) वापरले. साठ वर्षांवरील लाभार्थ्यांना निवृत्तीवेतन देण्याच्या योजना व गट विमा योजना आखण्यात आल्या नाहीत जे इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियमात नमूद केलेल्या कार्यांपैकी एक होते.

बांधकाम मजुरांना माध्यान्ह भोजन पुरविणाऱ्या अभिकरणांकडून देण्यात येणारे वितरण कार्ड नसल्याने लाभार्थ्यांचा तपशील आणि अभिकरणांनी वाटप केलेल्या भोजनाच्या संख्येची सत्यता पडताळता येत नसल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले आहे.

लाभार्थ्यांना सुरक्षा व जीवनावश्यक संचाचे एकापेक्षा अधिक वेळा वाटप, विविध योजनांअंतर्गत देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीत आढळून आलेले ज्यादा प्रदान अशा अनियमिततांमुळे यंत्रणेत अंगभूत नियंत्रणाचा अभाव असल्याचे आणि मंडळाच्या अधिकाऱ्यांकडून योग्य पडताळणी होत नसल्याचे दिसून येते.

विविध योजनांतर्गत लाभार्थ्यांकडून प्राप्त झालेले दावे मंजूर करण्यासाठी मंडळाने कोणतीही कालमर्यादा निश्चित केलेली नव्हती. राज्यात सुरू असलेली बांधकामे, कामगार

छावण्या, कामगार चौक आदींना भेटी देऊन प्रत्येक तालुक्यात (ग्रामीण भाग) व प्रभागात (शहरी भाग) सामाजिक अंकेक्षण जून 2024 पर्यंत करण्यात आले नाही.

शिफारस 10: लाभार्थ्यांना लाभ प्रदान करण्यापूर्वी विविध स्तरांवर दस्तऐवजांची योग्य पडताळणी करण्याची व विहीत अटींचे अनुपालन करण्याची विद्यमान प्रणाली मजबूत करावी.

शिफारस 11: शासनाने एकाच लाभार्थ्याला थेट हस्तांतरण प्रणालीतील अतिरिक्त प्रदाने करण्याची प्रकरणे टाळण्यासाठी अंगभूत नियंत्रणे विकसित करण्यासाठी तातडीने कृती करण्याची खात्री करणे गरजेचे आहे.

शिफारस 12: कामगारांनी सादर केलेल्या दाव्यांच्या मंजुरीसाठी शासनाने ठराविक कालमर्यादा निश्चित करणे आवश्यक आहे

(सी. एम. साने)

मुंबई
दिनांक: 22 जुलै 2025

प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I
महाराष्ट्र, मुंबई

प्रतिस्वाक्षरित

(के. संजय मूर्ती)

नवी दिल्ली
दिनांक: 25 जुलै 2025

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक